RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ८०(३)] बुधवार, मे २७, २०२६/ज्येष्ठ ६, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २७८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ मे, २०२६.

आदेश

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९.

क्रमांक एमपीआयडी-०२२६/प्र.क्र.२७/पोल-१५.—ज्याअर्थी, राहुरी तालुका राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर, नोंदणी क्र.एएनआर/आरएचआय/आरएसआर/सीआर/५२९/सन-२००३, दिनांक १६.०१.२००३ (यापुढे उक्त वित्तीय संस्था असा उल्लेख करण्यात आला आहे.) आणि सदर संस्थचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी यांनी मुदतीअंती लाभासह ठेवी परत करण्याचे आश्वासित करून ठेवी स्विकारल्या होत्या;

आणि ज्याअर्थी, उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी यांनी ठेवीदारांकडून स्वीकारलेल्या ठेवी मुदतपूर्तीनंतर ठेवीदारांना परत करण्यास कसूर केला असल्याने त्यांचेविरुध्द राहुरी पोलीस ठाणे, जिल्हा अहिल्यानगर येथे गु.र.क्र. ११५५/२०२२ भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) चे कलम ४०९, ४२०, ४६५, ४७७ अ आणि ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा १६) चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी हे ठेवीदारांनी मागणी केल्यानुसार ठेवी परत करण्यात अपयशी ठरले असून उक्त वित्तीय संस्थाद्वारे ठेवीदारांना ठेवी परत करण्याची शक्यता दिसून येत नाही;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेंचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी किंवा कोणतीही अन्य व्यक्ती यांनी जमा केलेल्या ठेवींमधून त्यांच्या स्वतःच्या अथवा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावे रक्कम व अन्य मालमत्ता संपादित करण्यात आली असल्याचे अभिकथित असल्याने, उक्त वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्याकरिता अशी रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करण्याचे आणि अशा जप्त रक्कम व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्याकरिता उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपुर भाग, श्रीरामपुर यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक वाटते;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा महाराष्ट्र १६) च्या कलम ४ चे पोट-कलम (१) व कलम ५ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे,—

(अ) अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, राहुरी तालुका राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर, आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी किंवा कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या नावे असलेली रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करीत आहे;

आणि

(ब) **सदर जप्त केलेल्या रक्कम व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपुर भाग, श्रीरामपुर, यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.**

अनुसूची

राहुरी तालुका राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर, आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी किंवा कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या जप्त करावयाच्या रक्कम व अन्य मालमत्तेची सूची खालीलप्रमाणे आहेः—

(अ) स्थावर मालमत्ता तपशीलः—

अ.क्र.	गाव /तालुका/जिल्हा	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता धारकाचे नाव
१.	मौजे टाकळीमिया, तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर	शेतजमीन दस्त क्रमांक. २४१७/२०१९ दि.१३.०८.२०१९ गट नं.१४, क्षेत्र-०.२१.०० हे.आर.चौ.मी.	कारभारी बापुसाहेब फाटक
२.	मौजे राहुरी बुद्रुक, तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर	शेतजमीन गट नं.८४/४, क्षेत्र-२.२७.०० हे.आर.चौ.मी.	भाऊसाहेब तुकाराम येवले
३.	मौजे राहुरी बुद्रुक, तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर	शेतजमीन गट नं.२१०/२, क्षेत्र-१.६२.०० हे.आर.चौ.मी.	सुरेश मंजु पवार अविभाज्य घटक
४.	मौजे राहुरी बुद्रुक, तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर	सदनिका दस्त क्रमांक. ९५/२०१६ दि.०८.०१.२०१६ गट नं.३९६/३/१/१/८,प्लॉट नं.८, नगरपालिका मिळकत नं. डब्ल्यु०४०००२१९, अशोका विहार, दुसरा मजला, सदनिका क्र.०३, क्षेत्र-६१.३२ चौ.मी.	दत्तात्रय विठ्ठल बोंबले अविभाज्य घटक
५.	मौजे अस्तगाव, तालुका राहता, जिल्हा अहिल्यानगर	शेतजमीन दस्त क्रमांक. ६०९६/२०११ दि.०२.१२.२०११ गट नं.८५५/१, क्षेत्र-०.३०.०० हे. आर.चौ.मी.	शरद लक्ष्मण निमसे

अ.क्र.	गाव /तालुका/जिल्हा	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता धारकाचे नाव
६.	मौजे अस्तगाव, तालुका राहता, जिल्हा अहिल्यानगर	शेतजमीन दस्त क्रमांक. १५७/१९९६ दि.२९.०१.१९९६ गट नं.८५६/२, क्षेत्र-०.१०.०० हे. आर.चौ.मी.	शरद लक्ष्मण निमसे अविभाज्य घटक

(ब) जंगम मालमत्ता बँक खात्यांचा तपशील

अ.क्र.	खातेदाराचे नाव	बँकेचे नाव	खाते क्रमांक
१.	कारभारी बापुसाहेब फाटक	नगर अर्बन बँक शाखा राहुरी	१०२२००६००३६१५
२.	कारभारी बापुसाहेब फाटक	नगर अर्बन बँक शाखा राहुरी	१०२२१४२००७४१०
३.	कारभारी बापुसाहेब फाटक	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१८४१००१८०१३२९०
४.	भाऊसाहेब तुकाराम येवले	नगर अर्बन बँक शाखा राहुरी	१०२२००६०००१२४
५.	भाऊसाहेब तुकाराम येवले	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१६७१००१८०००३४०
६.	सुनिल नारायण भोंगळ	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१४२१००१८०२२९४०
७.	सुनिल नारायण भोंगळ	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१४२१०३०९००१४२६
८.	सुरेखा संदिप सांगळे	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१४२१००१८०२३५९६
९.	सुरेखा संदिप सांगळे	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१०११००१८१२५३२८
१०.	सुरेश मंजु पवार	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	०१४२१००१८०१६१४८
११.	दत्तात्रय विठ्ठल बोंबले	दि.अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बँक अहिल्यानगर	००४२१००१८००८५५५

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अनुप कुमार सिंह,

शासनाचे प्रधान सचिव (विशेष).

HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, Dated the 26th May 2026.

Order

MAHARASHTRA PROTECTION OF INTEREST OF DEPOSITORS (IN FINANCIAL ESTABLISHMENTS) ACT, 1999.

No. MPID-0226/C.R.No.27/Pol-15.-Whereas, the Rahuri Taluka Rajmata Jijau Urban Cooperative Credit Society Limited, Rahuri, District Ahilyanagar, Registration No. ANR / RHI / RSR / CR / 529 / Year-2003, dated 16.01.2003 (hereinafter referred to as "the said Financial Establishment") and its Chairman, Directors, Managers, Promoters, Partners, Members and its employees received deposits from depositors under the scheme to repay the deposits on maturity along with benefits promised thereof to the depositors;

And whereas, offence has been registered against the said Financial Establishment and its Chairman, Directors, Managers, Promoters, Partners, Members and its employees at Rahuri Police Station, District Ahilyanagar, vide FIR No. 1155/2022 under sections 409, 420, 465, 477 A and 34 of the Indian Penal Code (45 of 1860) and section 3 of the Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act 1999, (Mah. XVI of 2000), that they have collected the deposits and have failed to repay the deposits after maturity;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that the said Financial Establishment and its Chairman, Directors, Managers, Promoters, Partners, Members and its employees have failed to repay the deposits on demand by the depositors and the said Financial Establishment are not likely to repay the deposits to the depositors;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to attach the monies and other properties believed to have been acquired by the said Financial Establishment and its Chairman, Directors, Managers, Promoters, Partners, Members and its employees or any other person either in their own name or in the name of any other person out of the deposits collected by the said Financial Establishment, in order to protect the interest of the depositors of the said Financial Establishment and to appoint Sub-Divisional Magistrate, Srirampur Division, Srirampur, as the Competent Authority to excercise control over the monies and other properties attached;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 and sub-section (*1*) of section 5 of the Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act, 1999 (Mah. XVI of 2000), the Government of Maharashtra hereby,—

(*a*) attaches the monies and other properties in the name of Rahuri Taluka Rajmata Jijau Urban Cooperative Credit Society Limited, Rahuri, District Ahilyanagar and its Chairman, Directors, Managers, Promoters, Partners, Members and its employees or any other person, as specified in the Schedule appended hereto; and

(*b*) appoints the Sub-Divisional Magistrate, Srirampur Division, Srirampur, to be the Competent Authority, to exercise control over the monies and other properties attached.

Schedule

The list of monies and other properties of the Rahuri Taluka Rajmata Jijau Urban Cooperative Credit Society Limited, Rahuri, District Ahilyanagar and its Chairman, Directors, Managers, Promoters, Partners, Members and its employees or any other person to be attached are as follows, namely:-

(A) Immovable Properties Details :—

Sr. No.	Village/ Taluka/ District	Property Details	Name of Owner
1.	Mouje Taklimia, Taluka Rahuri, District Ahilyanagar	Agricultural Land Document No. 2417/2019 Date 13.08.2019 Group No. 14, Area-0.21.00 He.R.Sq.Mt.	Karbhari Bapusaheb Fatak
2	Mouje Rahuri Budruk, Taluka Rahuri, District Ahilyanagar	Agricultural Land Gut No.84/4, Area-2.27.00 He.R.Sq.M.	Bhausaheb Tukaram Yevle
3.	Mouje Rahuri Budruk, Taluka Rahuri, District Ahilyanagar	Agricultural Land Gut No.210/2, Area-1.62.00 He.R.Sq.Mt.	Suresh Manju Pawar Integral Part
4.	Mouje Rahuri Budruk, Taluka Rahuri, District Ahilyanagar	Flat Document No. 95/2016 Date 08.01.2016 Gut No. 396/3/1/1/8, Plot No. 8, Municipal Property No. W04000219, Ashoka Vihar, 2nd Floor, Flat No. 03, Area-61.32 Sq.Mt.	Dattatreya Vitthal Bombale Integral Part
5.	Mouje Astgaon, Taluka Rahta, District Ahilyanagar	Agricultural Land Document No. 6096/2011 Date 02.12.2011 Gut No. 855/1, Area-0.30.00 Hectares. R.Sq.Mt.	Sharad Laxman Nimse
6.	Mouje Astgaon, Taluka Rahta, District Ahilyanagar	Agricultural Land Document No. 157/1996 Date 29.01.1996 Gut No. 856/2, Area-0.10.00 Hectares. R.Sq.Mt.	Sharad Laxman Nimse Integral Part

(B) Bank Accounts Details :-

Sr. No.	Name of Account Holder	Name of Bank	Account No.
1.	Karbhari Bapusaheb Fatak	Nagar Urban Bank Branch Rahuri	1022006003615
2.	Karbhari Bapusaheb Fatak	Nagar Urban Bank Branch Rahuri	1022142007410
3.	Karbhari Bapusaheb Fatak	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	018410018013290
4.	Bhausaheb Tukaram Yevle	Nagar Urban Bank Branch Rahuri	1022006000124
5.	Bhausaheb Tukaram Yevle	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	016710018000340
6.	Sunil Narayan Bhongal	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	014210018022940
7.	Sunil Narayan Bhongal	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	014210309001426
8.	Surekha Sandeep Sangle	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	014210018023596

Sr. No.	Name of Account Holder	Name of Bank	Account No.
9.	Surekha Sandeep Sangle	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	010110018125328
10.	Suresh Manju Pawar	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	014210018016148
11.	Dattatray Vitthal Bombale	The Ahmednagar District Central Co.op. Bank Ahilyanagar	004210018008555

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUP KUMAR SINGH,
Principal Secretary (Special) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.